**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**आयएस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**
**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

ई-मेल : mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७२५७.
वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.

निविदा अर्जाची किंमत रु. ३००/- निविदा अर्ज क्र. ० /आस्था-३/२०१०

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे कार्यालय व कार्यालयीन परिसराकरीता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतचा निविदा अर्ज .

---

| | | |
|---|---|---|
| १ | **निविदा अर्ज घेणा-या निविदाधारकाचे नांव व पत्ता** | |
| २ | **दूरध्वनी क्रमांक / भ्रमणध्वनी क्रमांक** | |
| ३ | **निविदा सादर करण्याची मुदत** | दि. २३/८/२०१० रोजी दुपारी २.०० पर्यत. |
| ४ | **निविदा उघडण्याची तारीख व वेळ** | दि. २३/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता. |

(सर्व अधिकार सुरक्षित)

**गणेश ठाकूर**
**महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद**
**पुणे-४११ ००७**

# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

**आय्एस्ओ ९००१ : २००८ मानांकित संस्था**

**१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.**

MCAER कृषि परिषद

MCAER कृषि परिषद २००८-२००९

**ई-मेल : mcaer@rediffmail.com** **दूरध्वनी : (०२०) २५५३ ७२५७.**

**वेबसाईट : www.mcaer.org** **फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.**


**निविदा अर्ज क्रमांक :-** **किंमत रुपये ३००/-**

---

**१. सुरक्षा रक्षक पुरवठयाचा तपशील :-**

महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे-७ येथील कार्यालय व कार्यालयीन परिसराची सुरक्षा करण्याकरिता सुरक्षा रक्षक पुरवठा करणा-या नोंदणीकृत परवानाधारक कंत्राटदार / एजन्सीकडून मा.महासंचालक,महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे-७ हे मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

**२. सुरक्षा रक्षक कर्मचा-यांच्या साठी शैक्षणिक अर्हता,कामाचे स्वरुप व वेळ :-**

| अ.क्र. | कर्मचा-यांचे पदनाम व वय | शैक्षणिक पात्रता व अनुभव | कामाचे स्वरुप | कामाची वेळ (दिवसाला तीन शिफ्ट्स ) |
|---|---|---|---|---|
| १ | सुरक्षा रक्षक<br>वय ३५ ते ५० वर्ष | १० वी उत्तीर्ण व सुरक्षा विषयक कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव माजी सैनिक व होमगार्ड गटातील नागरिकांना प्राधान्य | कार्यालयीन इमारतीची व परिसरातील जंगम मालमत्तेची सुरक्षा करणे. | १) सकाळी ८.०० ते दुपारी ४.००<br>२) दुपारी ४.०० ते रात्री १२.००<br>३) रात्री १२.०० ते सकाळी ८.०० |

**३. निविदा अर्ज विक्री, स्वीकृती व उघडणे :-**

(१) निविदा अर्जाची किंमत **रु.३००/-** कार्यालयीन रोखपाल यांच्याकडे रोख व धनाकर्षव्दारे शुल्क भरणा केल्यानंतर निविदा संच कार्यालयामध्ये दिनांक २/८/२०१० ते २१/८/२०१० पर्यत सकाळी ११.०० ते दुपारी ४.०० पर्यत कामकाजाचे दिवशी मिळेल.

(२) मोहोरबंद निविदा या कार्यालयात उशीरात उशिरा दि. २३/८/२०१० रोजी पर्यत दुपारी २.०० वाजेपर्यत स्वीकारल्या जातील, त्यांनतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.

(३) दि. २३/८/२०१० रोजी दुपारी ४.०० वाजता या कार्यालयाच्या सभागृहात उपस्थित कंत्राटरांसमक्ष निविदा उघडण्यात येतील.

४. **अनामत रक्कम :-**

निविदा अर्जासोबत **' सल्लागार (वित्त),महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे-७'** यांच्या नांवे, **स्टेट बॅक ऑफ इंडिया,शाखा-पुणे विद्यापीठ रोड,पुणे-५ कोड नं.७३३९** वर अनामत रक्कम रु. १०,०००/- चा काढलेला राष्ट्रीयकृत बॅकेचा धनाकर्ष मोहोरबंद **लखोटा क्र.१** मधील कागदपत्रांसोबत जोडण्यात यावा. लखोट्यात धनाकर्ष जोडला नसल्यास निविदेचा विचार केला जाणार नाही.

५. **निविदा कागदपत्रात काही सुधारणा किंवा बदल करणे :-**

निविदेच्या अटी व शर्ती किंवा निविदा कागद पत्रामध्ये काही बदल किंवा सुधारणा करण्याचे अधिकार मा.महासंचालक,कृषी परिषद यांना राहतील. निविदेत सुधारणा करण्यापूर्वी अशी सुधारणा किंवा बदल केल्याबाबतची माहिती सर्व पात्र निविदाकारांना कळविण्यात येईल.

६. **कंत्राटदार/ एजन्सी यांना मार्गदर्शक सूचना :-**

(१) सर्व कंत्राटदार / एजन्सीने निविदाच्या कागदपत्रांचा, सर्वसाधारण अटी व शर्ती , इत्यादी बद्दलचा सखोल अभ्यास करुन निविदा भरावी.

(२) निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रातून कोणताही कोरा किंवा कसलाही दस्तऐवज काढता येणार किंवा लावता येणार नाही.

(३) कंत्राटदार / एजन्सीने मागणी केलेल्या सर्व प्रमाणपत्रांच्या प्रती जोडणे आवश्यक आहे. सर्व प्रमाणपत्रे निविदा उघडण्याच्या तारखेस वैध असावीत.

(४) **लखोटा क्रमांक-१** मधील कागदपत्रे व्यवस्थितपणे पूर्ण नसतील, तर **लखोटा क्रमांक-२** उघडला जाणार नाही. म्हणजेच ती निविदा ' दप्तरी दाखल ' केली जाईल.

(५) कंत्राटदार / एजन्सी सध्या करीत असलेल्या कामांवर कृषी परिषद कार्यालयातील प्रतिनिधी भेट देऊ शकतील व त्यांच्या कामाचा दर्जा तपासून त्या आधारे कंत्राटदार / एजन्सी यांना पात्र किंवा अपात्र ठरविण्याचे सर्व अधिकार मा.महासंचालक,कृषी परिषद,पुणे यांच्याकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

(६) सदर कंत्राटी कामाचा कालावधी एक वर्षाचा राहील. आवश्यकतेनुसार तो वाढविण्याचा अथवा कमी करण्याचा अधिकार मा.महासंचालक,कृषी परिषद हे राखून ठेवीत आहेत.

(७) निविदेमध्ये काही बदल करावयाचा झाल्यास तसेच एखादी निविदा अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा. महासंचालक,कृषी परिषद यांनी राखून ठेवले आहेत.

(८) कंत्राटी पध्दतीने सुरक्षा सेवा पुरविणेसाठी **महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी गार्डस् ॲक्ट,१९८१** च्या अंतर्गत नोंदणीकृत परवानाधारक कंत्राटदार / एजन्सी यांना सुरक्षा रक्षक पुरविण्यासाठी निविदा सादर करता येईल.

(९) निविदा मंजूर झाल्याबाबतचे मा.महासंचालक,कृषी परिषद यांचे आदेश प्राप्त झाल्यानंतर, १५ दिवसांच्या आत सदर कंत्राटदार / एजन्सीने रु.१००/- च्या मुद्रांक शुल्क बाँड पेपरवर या कार्यालयाने विहित केलेल्या अटी व शर्तीनुसार करारपत्र करुन द्यावे लागेल.

**७. मोहरबंद लखोटा क्रमांक-१ मध्ये खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत :-**

**या मोहरबंद लोखट्याच्या पृष्ठभागावर ' लखोटा क्रमांक-१ ' असे स्पष्ट नमूद करण्यात यावे. या पाकिटात लखोटा क्रमांक-२ मधील निविदेच्या किंमतीचा कसलाही उल्लेख करु नये.**

(१) महाराष्ट्र प्रायव्हेट सिक्युरिटी गार्डस् ॲक्ट,१९८१ च्या अंतर्गत नोंदणी परवान्याची छायांकित प्रत जोडण्यात यावी.

(२) निविदाकाराने (अ) मुंबई दुकाने व संस्था नियम,१९६१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र, (ब) व्यवसाय कर / सेवा कर प्रमाणपत्र, (क) ई.एस्.आय्.ॲक्ट,१९४८ नोंदणी प्रमाणपत्र (ड) विभागीय भविष्य निर्वाह नोंदणी प्रमाणपत्रांची छायांकित प्रती जोडण्यात याव्यात.

(३) ' अनामत रकमेचा ' ( Earnest Money Deposit) रुपये १०,०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा 'सल्लागार (वित्त),महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे' यांच्या नावाने काढलेला धनाकर्ष जोडवा.

(४) भागीदारी संस्था असेल तर **भागीदारीचा करार,मेमोरँडम ऑफ असोसिएशन किंवा पॉवर ऑफ ॲटर्नीची** कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे.

(५) कंत्राटदार / एजन्सीने सरकारी व निमसरकारी कार्यालयास सुरक्षा रक्षकांच्या सेवा समाधानकारक पुरवठा केलेल्या कामांबाबत **मागील तीन वर्षांच्या प्रमाणपत्रांच्या** छायांकित प्रती सादर केल्यानंतरच निविदा ग्राहय धरण्यात येईल.

(६) कंत्राटदार / एजन्सीच्या सध्या हाती असलेल्या कामांचा, कामांच्या पत्यासह तपशील जोडण्यात यावा.

(७) कंत्राटदार / एजन्सी ज्या सुरक्षा रक्षकांच्या सेवा या कार्यालयास पुरविणार आहे, अशा सध्या काम करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांची शैक्षणिक पात्रता,अनुभव इ.माहितीसह यादी जोडण्यात यावी.

**८. मोहरबंद लखोटा क्रमांक-२ मध्ये द्यावयाची कागदपत्रे,लखोट्याच्या पृष्ठभागावर ' लखोटा क्रमांक-२ ' असे स्पष्ट नमूद करण्यांत यावे :-**

(अ) किमान वेतन अधिनियम, १९४८, (ब) कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम, १९५२, (क) राज्य कर्मचारी विमा योजना अधिनियम, १९४८,(ड) दि पेमेंट ऑफ ग्रॅच्युएटी ॲक्ट, १९७२,(इ) दि पेमेंट ऑफ बोनस ॲक्ट १९६५, नुसार व इतर देय असलेल्या करांचा समावेश करुन एकत्रित वेतनाच्या दराचा उल्लेख निविदा अर्जातील ' **दरपत्रक नमुना** ' मध्ये अंकात व अक्षरात अशा दोन्ही स्वरुपात करण्यात यावा.

९. <u>कराराच्या अटी व शर्ती :-</u>

(१) कंत्राटदार / एजन्सीने प्राधान्याने पुरुष सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक आहे. या कार्यालयास आवश्यकता भासली, तरच महिला सुरक्षा रक्षक पुरविण्याबाबत स्वतंत्ररित्या मौखिक व लेखी सूचना देण्यात येतील.

(२) कंत्राटदार / एजन्सीने नेमलेल्या सुरक्षा कर्मचा-यांना देण्यात येणारे **नियमित मासिक वेतनाचे दर किमान वेतन अधिनियम,१९४८ मधील तरतुदीनुसार निर्धारित केलेल्या वेतनापेक्षा कमी नसावेत.**

(३) सुरक्षा रक्षक कर्मचा-याचे सेवा कर, इ.एस्.आय्, भविष्य निर्वाह निधी व कामगार कायद्यास अनुसरुन इतर सर्व कायदेशीर बाबींचा संबधित कार्यालयात वेळेत भरणा करणे कंत्राटदार / एजन्सीला बंधकारक राहील.

(४) सुरक्षा रक्षक यांना **नियमानुसार गणवेश, ओळखपत्र ,विजेरी ,शिट्टी व काठी व दरमहा विजेरीसाठी सेल** इत्यादी साहित्य कंत्राटदार/एजन्सीने पुरविणे बंधकारक राहील. कृषी परिषद कार्यालयाकडून कोणत्याही प्रकारचे गणवेश व इतर साहित्य पुरविले जाणार नाही.

(५) कंत्राटदार / एजन्सीकडून पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकाकडून कोणाच्या जीवितास धोका पोहचणार नाही असे वर्तन असावे. सुरक्षा रक्षकास अथवा कोणत्याही व्यक्तीच्या जीवितास धोका झाल्यास संबंधित व्यक्तीस नुकसान भरपाई देण्याची जबाबदारी कंत्राटदार/ एजन्सी यांची राहील.

(६) कृषी परिषदेच्या जंगम मालमत्तेचे नुकसान किंवा चोरी झाल्यास त्याची नुकसान भरपाई पोटी देय होणारी रक्कम कंत्राटदार / एजन्सीच्या सुरक्षा ठेवीतून अथवा मासिक देयकातून परस्पर कपात करुन घेण्यात येईल.

(७) कंत्राटदार/ एजन्सीने ३५ ते ५० या वयोगटातील प्रशिक्षित/निरोगी तसेच शारिरिक व मानसिदृष्ट्या सक्षम असलेले सुरक्षा रक्षक पुरविणे आवश्यक आहे.

(८) सदर निविदेतील कामाच्या सेवा कमी,अधिक अथवा रद्द करण्याचे सर्व अधिकार मा.महासंचालक,कृषी परिषद यांना राहतील.

(९) सदर कामाची मुदत एक वर्षाची राहील तसेच कंत्राटदार / एजन्सी यांच्या **कामाचा दर्जा समाधानकारक राहिला नाही, तर सदरचे काम कंत्राटधारकास एक महिन्याची नोटीस देऊन काढून घेण्यात येईल.**

(१०) कंत्राटदार / एजन्सीकडून पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांनी कार्यालयीन शिस्तीचे पालन करणे बंधनकारक असून, शिस्तीचे पालन करतात की नाही, याची देखरेख करण्याचे काम कंत्राटदाराचे राहील.

(११) कंत्राटदार / एजन्सीने सुरक्षा रक्षक पुरवठा करण्यास नकार दिला, तर त्याची अनामत रक्कम जप्त करण्यात येईल व याबाबतचे सर्व अधिकार मा. महासंचालक,कृषी परिषद यांना राहतील.

(१२) कंत्राटदार / एजन्सीने पुरविण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांनी व्यवस्थित काम न केल्यास अथवा कार्यालयात अचानकपणे गैरहजर राहिल्यास, त्याच्या ऐवजी तात्काळ बदली सुरक्षा रक्षक पुरविण्यात यावा.

(१३) मुख्य कार्यालय प्रवेशव्दारामधून येणा-या व्यक्ती व वाहने यांच्यावर नियंत्रण ठेवणे व त्यांच्या नोंदी करणे, तसेच अनधिकृत व्यक्तींना व वाहनांना प्रवेश करण्यास सुरक्षा रक्षक प्रतिबंध करतील. तसेच मोकाट जनावरे संचार करणार नाहीत,याची काळजी घेतील.

(१४) सर्व सुरक्षा रक्षक यांचे सेवा कर, भविष्य निर्वाह निधी व इ.एस्.आय्. यांची वर्गणी भरणा केलेल्या चलनाच्या छायाप्रती आणि सुरक्षा रक्षकांचा मासिक उपस्थिती अहवाल या कार्यालयास पुढील महिन्याच्या ५ तारखेपर्यत मासिक देयकासमवेत सादर करण्यात यावेत.

(१५) केंद्र शासन व महाराष्ट्र शासनाकडून सेवा बाबी विषयक करांमध्ये कमी / जास्त बदल झाल्यास त्याची भरपाई कृषी परिषद कार्यालयाकडून केली जाणार नाही. या बाबतची संपूर्ण जबाबदारी ही संबंधित कंत्राटदार / एजन्सीची राहील.

(१६) निविदा मंजूर झाल्यानंतर कंत्राटदारकडून **' सुरक्षा ठेव'(Security Deposit)** म्हणून प्रत्येक मासिक देयकातून १० % इतकी रक्कम वजावट करुन कृषी परिषद कार्यालयात जमा करण्यात येईल, याबाबतचे सर्व अधिकार मा. महासंचालक, कृषी परिषद, पुणे यांना राहतील.

(१७) कृषी परिषदेच्या परिसरामधून बाहेर नेण्यात येणारी इलेक्ट्रील वस्तू, यंत्रसामुग्री किंवा इतर साहित्याची वाहतूक करण्यास सक्षम अधिका-याची अधिकृत पावती /परवानगी असल्याशिवाय आवाराच्या बाहेर जाण्यास परवानगी देण्यात येऊ नये.

(१८) कंत्राटदार / एजन्सीच्या मासिक देयकातून नियमानुसार टी.डी.एस. प्राप्तीकराची वजावट करण्यात येईल व तसे प्रमाणपत्र देण्यात येईल,याबाबतचे सर्व अधिकार मा.महासंचालक,कृषी परिषद यांना राहतील.

(१९) कंत्राटदार / एजन्सीने दैनंदिन संख्येपेक्षा कमी सुरक्षा रक्षक पुरविल्यास त्या दिवशी मंजूर दराच्या दैनिक दराव्यतिरिक्त त्या दिवसाच्या दराएवढी रक्कम ' दंड ' म्हणून आकारण्यात येऊन त्या त्या महिन्यांच्या मासिक देयकातून ती कपात करण्यात येईल.

(२०) कंत्राटदार / एजन्सीमार्फत पुरवठा केलेल्या सुरक्षा रक्षकांचा कायदेशीर हक्क, हितसंबंध,मोबदला व नुकसान भरपाई इत्यादीबाबतीत एजन्सी / कंत्राटदार हे सर्वस्वी जबाबदार राहतील. व त्याची कोणत्याही प्रकारची जोखीम कृषी परिषद कार्यालयावर राहणार नाही.

(२१) कंत्राटदार / एजन्सीने कायद्याचे पालन न केल्यास होणा-या सर्व परिणामांची जबाबदारी सर्वस्वी कंत्राटदार / एजन्सी यांची राहील.

(२२) निविदाकाराने मूळ निविदा सादर करतांना, **प्रस्तुत निविदा पुस्तिकेमधील दरपत्रक नमुन्यामध्ये निविदा रक्कम भरुन** सदरची पुस्तिका **लखोटा क्र.२** मध्ये सीलबंद करुन सादर करावी.

**( गणेश ठाकूर )**
**महासंचालक**

**प्रति,**

**मा.महासंचालक**
**महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,**
**पुणे -४११ ००७**

विषय :- सुरक्षा सेवा पुरविण्याबाबतची निविदा.
संदर्भ :- महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे यांची जाहिरात क्र.-----------
दि. / /२०१०.

महोदय,

उपरोक्त संदर्भाधिन प्रसिध्द करण्यात आलेल्या निविदा सूचनामधील अटी व शर्ती वाचून,समजून घेऊन मी खाली सही करणार पुढील प्रमाणे निविदा सादर करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे / एजन्सीचे नांव | ........................................................<br>........................................................ |
| २ | संस्थेच्या कार्यालयाचा पत्ता व दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ........................................................<br>........................................................ |
| ३ | संस्था चालकाचे नांव ,पत्ता व दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक | ........................................................<br>........................................................ |
| ४ | संस्था नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| ५ | मुंबई दुकाने व संस्था नियम, १९६१ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| ६ | व्यवसाय कर / सेवा कर नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| ७ | ई.एस्.आय्. ॲक्ट,१९४८ नुसार नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| ८ | विभागीय भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| ९ | महाराष्ट्र राज्य व्यवसाय,व्यापार,आजीविका व नोकर यावरील कर अधिनियम,१९७५ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र क्रमांक व दिनांक | ........................................................<br>........................................................ |
| १० | संस्थेचे टीएएन (TAN) क्रमांक | ........................................................<br>........................................................ |

| ११ | अनुभव (पुरेशी जागा उपलब्ध नसल्यास स्वतंत्र प्रपत्र जोडावे.) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | **अ.क्र.** | **सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या कार्यालयाचे / संस्थेचे नांव** | **सुरक्षा रक्षक पुरविण्यात आलेल्या मनुष्यबळाची संख्या** | **कराराची मुदत** | **अभिप्राय** |
| | १ | | | | |
| | २ | | | | |
| | ३ | | | | |
| | ४ | | | | |
| | ५ | | | | |
| १२ | निविदा सोबत अनामत रकमेचा जोडलेले रु.१०,०००/- रकमेचा धनाकर्षाचा तपशील | | बॅंकेचे नांव :- ................................................ ................................................<br>धनाकर्ष नंबर :-................................................<br>दिनांक :- ................................................ | | |

**एका सुरक्षा रक्षकास मासिक देय असलेले वेतन दराचा तक्ता**

| पदनाम | मासिक वेतन रु. | मासिक सेवा कर रु. | मासिक व्यवसाय कर रु. | भविष्य निर्वाह निधी मासिक वजाती रु. | इ.एस.आय मासिक वजाती रु. | मासिक प्रशासकीय खर्च रु. | इतर खर्च रु. | देय एकत्रित मासिक वेतन रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सुरक्षा रक्षक | | | | | | | | |

( अक्षरी रक्कम रु. ----------------------------------------------------- ------- )

सही करणा-याची स्वाक्षरी
व नांव :- (-------------------)
संस्थेचा शिक्का :-

दिनांक / /२०१०
संस्थेचा शिक्का

# प्रमाणपत्र

मी, खाली सही करणार श्री./श्रीमती ------------------------------------------------------------ पदनाम, ------------------------------------- असे नमूद करतो / करते की, मी महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे यांच्या जाहिरत क्रमांक -------- दिनांक  /  /२०१० अन्वये सुरक्षा सेवा पुरविण्याची निविदा विहित नमुन्यात भरुन दाखल करीत आहे. उपरोक्त निविदा अर्जात नमूद केलेली सर्व माहिती आणि पुराव्यादाखल जोडलेली सर्व प्रमाणपत्रे ही माझ्या माहितीप्रमाणे बरोबर व सत्य आहेत, अशी मी हमी देत आहे. यात कोणतीही बाब असत्य आढळल्यास किंवा सिध्द झाल्यास कोणत्याही स्तरावर माझी निविदा अपात्र ठरविण्यात येईल, याची मला पूर्ण जाणीव आहे.

तसेच मी असेही नमूद करतो/करते की, उपरोक्त जाहिराती मधील निविदा संबंधी सर्व नियम व अटी मी काळजीपूर्वक वाचलेली असून, त्या माझ्यावर बंधनकारक राहतील. निवड समितीने निविदा वैध / अवैध ठरविण्याबाबतचा घेतलेला निर्णय माझ्यावर बंधनकारक राहील, याची मला पूर्ण जाणीव आहे.

स्थळः-
दिनांकः-

( निविदाकाराची स्वाक्षरी व शिक्का )
नांव --------------------------